**अर्जदार यांचा पुढील सरतपास अर्जदारातर्फे विधीज्ञ टी.आर. कोळी यांचेमार्फत शपथेवर सूरू....**

३७. साक्षीदाराने दाखल केलेल्या कागदपत्रांना निशाणी देण्यास सामनेवाल्यांच्या वकीलांनी सदर कागदपत्र हे साक्षांकीत प्रती असल्यामुळे हरकत घेतलेली नाही. त्यामुळे सदर कागदपत्रांना निशाणी क्रमांक देण्यात येते. मौजे बोरीपाखाडी निवाडा क्र.१/९०/३९ च्या साक्षांकीत प्रतीस नि.क्र.२३ देण्यात येते. मौजे बोकडविरा युनीट केस क्र.२१० + २१०A/८७ च्या ॲवॉर्डच्या साक्षांकीत प्रतीस नि.क्र.२४ देण्यात येते. अर्जदाराने उरण नगरपरिषदेला दि.०१/१०/२०२५ रोजीच्या पत्राची स्थळप्रत त्यावर उरण नगरपरिषदेच्या लिपीकाची पोच म्हणून सही असलेली त्यास नि.क्र.२५ देण्यात येते. उरण नगरपरिषदेने अर्जदारास दिलेल्या पत्राची प्रत नि.क्र.२६. डी.पी. प्लॅनची साक्षांकीत प्रत नि.क्र.२७, डीपी रीपोर्ट नि.क्र.२८, अर्जदाराच्या नावे असलेली उरण नगरपरिषदेची पावती नि.क्र.२९

सरतपास पूर्ण.

**अर्जदार यांचा उलटतपास सामनेवालाकरिता सहा. सरकारी वकील श्री. वाय. एस.भोपी यांचेमार्फत शपथेवर सुरू.**

३८. हे म्हणणे खरे आहे की, बोरीपाखाडी हे गावा चाणजे व बोकडविरा या गावांना लागून आहे. सदर भूसंपादीत झालेली माझी जमीन ही ओसाड आहे परंतू खाजण नाही. हे म्हणणे खरे आहे की, भूसंपादीत झालेली माझी जमीन खाजण आहे असे ॲवॉर्डमध्ये नमूद केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझी भूसंपादीत जमीन बीगरशेती झालेली नव्हती. सदर जमिनीच्या पुर्वेस खाडी आहे का हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझया भूसंपादीत जमिनीच्या आजूबाजूच्या जमिनीचे संबंधीत कालावधीमध्ये खरेदी विक्री व्यवहार झाले होते हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा मी दाखल केला नाही. सदर भूसंपादीत जमिन खाजण असल्यामुळे तसेच जमिनीमध्ये खड्डे असल्यामुळे सदर जमिनीला भरावाची गरज आहे असे ॲवॉर्डमध्ये नमूद केलेले आहे. परंतू, सदर बाब सत्य नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर जमिनीमध्ये संबंधीत कालावधीमध्ये कोणतेही बांधकाम उभे नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी दाखल केल्याप्रमाणेचा डीपी प्लॅन सदर गावासाठी अद्याप अस्तित्वात आलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर डीपी प्लॅनचे रिव्हीजन चालू आहे. हे म्हणणे

खरे नाही की, बोरी गावाची जमीन ही चाणजे व बोकडवीरा गावाच्या जमिनीच्या तुलनेत कमी प्रतिची आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर जमिन नगरपालिकेच्या हद्दीत असली तरीही तिची अकृषीक क्षमता कमी होती. हे म्हणणे खरे नाही की, सदर जमिनीसदरी रस्ते, पाणी, वीज या सुविधांची उपलब्धता नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी माझया पुराव्याच्या शपथपत्रामध्ये माझे सदर संपादीत जमिनींच्या पासून जवळपास असलेल्या सुविधांबाबत अंतर मी अंदाजे दिलेले असून ते पुर्ण सत्य नाही. हे म्हणणे खरे नाही की, १५ टक्के मार्केटच्या किंमतीपेक्षा उच्च दर्जा देणेची माझी मागणी ही चुकीची आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी मागितलेल्या वाढीव मोबदल्याची रक्कम योग्य नाही.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

VAISHALI RAJENDRA HANGARGEKAR

Digitally signed by VAISHALI RAJENDRA HANGARGEKAR
Date: 2025.12.24 11:54:36 +0530

दिनांक : २३/१२/२०२५

(वैशाली हंगरगेकर)
सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,
पनवेल—रायगड.